# महाराष्ट्र शासन


समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३, चर्च पथ, पुणे- ४११ ००१.

दूरध्वनी क्रमांक-०२०-२६१२२६५२/२६१२७५६९ E-mail- directorsocialwelfare@yahoo.co.in


## अनुसूचित जातीच्या (Schedule Caste) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी आवाहन

१. सन २०१७-१८ पासून महाराष्ट्र शासनातर्फे सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी एकत्रित संकेतस्थळ विकसित करण्यात आलेले आहे. महाडीबीटी हे या संकेतस्थळाचे नाव असून https://mahadbt.gov.in हे संकेतस्थळ संचालक, माहिती व तंत्रज्ञान (DIT) यांचेमार्फत कार्यान्वित करण्यात आले आहे. सामाजिक न्याय विभागाच्या शिष्यवृत्ती / शिक्षण फी परिक्षा फी/ विदयावेतने / निर्वाह भत्ता वितरीत करावयाच्या योजनांचा समावेश या संकेतस्थळामध्ये करण्यात आला आहे.

२. आतापर्यंत शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर आणि शिक्षण फी - इतर शुल्काची रक्कम विद्यार्थी ज्या महाविद्यालयात शिक्षण घेत आहे,त्या महाविद्यालयाच्या खात्यावर जमा करण्यात येत होती. परंतू आता देय होणारी वित्तीय लाभाची सर्व रक्कम ही लाभार्थी विद्यार्थ्याच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे.

३. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शिक्षण फी परिक्षा फी, निर्वाह भत्ता, विदया वेतने विषयक योजनांचा लाभ मिळणेकरिता स्वत:ची नोंदणी करणे, अर्ज भरणे, अर्ज भरल्यापासून ते रक्कम लाभार्थ्याच्या बँक खात्यात जमा करण्याची सर्व प्रक्रिया आता राज्यस्तरीय डीबीटी पोर्टलमार्फत करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

४. विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर ही लाभाची रक्कम जमा केल्याबाबतची सूचना डीबीटी पोर्टलव्दारे प्रत्येक महाविद्यालयाला दिली जाईल. त्यामुळे संबंधित विद्यापीठ / शैक्षणिक संस्था / महाविद्यालय / तंत्रनिकेतने यांनी कोणत्याही अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची रक्कम घेवू नये. तसेच कोणत्याही अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्याची आर्थिक पिळवणूक होणार नाही याची योग्य ती दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित शैक्षणिक संस्थांची असेल.

## सामाजिक न्याय विभागाच्या ऑनलाईन योजना :-

| योजनेचे नाव | लाभाचे स्वरुप | विद्यार्थ्याची पात्रता |
|---|---|---|
| भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | • विद्यार्थ्यास निर्वाह भत्ता व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर मान्य बाबीवरील शुल्क प्रदान केले जाते.<br>• दरमहा रु २३० ते १२०० या दराने निर्वाह भत्ता अनुज्ञेय आहे. | • अनु. जाती व नवबौध्द प्रर्वगातला असावा.<br>• पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २ लाखापेक्षा कमी असावे.<br>• मान्यताप्राप्त महाविद्यालयात शालांत परीक्षोत्तर व त्या पुढील शिक्षण घेत असलेला असावा.<br>• महाराष्ट्राचा रहिवासी असावा. |
| राज्य शासनाची मॅट्रिकोत्तर शिक्षण फी परिक्षा फी प्रतीपुर्ती योजना | • अनु. जातीच्या विद्यार्थाना त्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर विहीत केलेले शुल्क देण्यात येते. | • अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवगातील असावा.<br>• भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या योजनेचा लाभ घेणारा नसावा.<br>• पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २ लाखपेक्षा जास्त असावे.<br>• मान्यताप्राप्त महाविद्यालयात शालांत परीक्षेत्तर (इ.१०वी नंतरचे) शिक्षण घेणारा असावा.<br>• महाराष्ट्राचा रहिवासी असावा.<br>• ठराविक अभ्यासक्रमासाठीच लागु. |
| राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती ( इ. ११ वी १२ वी ) | • इ. १०वी मध्ये ७५% व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून ११वी व १२वीमध्ये शिकणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना दरसाल रु.३०००/- शिष्यवृत्ती देण्यात येते. | • इयत्ता १० वी मध्ये ७५% व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेला असावा.<br>• इ. ११वी व १२ वी या दोन वर्षासाठी अनुज्ञेय.<br>• महाराष्ट्राचा रहिवासी असावा.<br>• अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवगातील असावा. |
| सैनिक शाळेतील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता | • नाशिक, पुणे, सातारा येथील सैनिक शाळांमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांची शिक्षण फी, परीक्षा फी, भोजन, निवास, कपडे व घोडेस्वारी इत्यादीवर होणा-या संपुर्ण खर्चाची प्रतीपुर्ती करण्यात येते.<br>• इतर मान्यताप्राप्त सैनिक शाळांना प्रति विद्यार्थी प्रतिवर्षी रु.१५,०००/- निर्वाहभत्ता देण्यात येतो. | • इ.५ वी ते १० वी पर्यंतच्या वर्गात शिकत असलेला असावा.<br>• अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवगातील असावा.<br>• महाराष्ट्राचा रहिवासी असावा.<br>• पालकाचे वार्षिक उत्पन्न रु.६५२९०/- पेक्षा जास्त नसावे. |

| | | |
|---|---|---|
| राज्य शासनाची मॅट्रिकपुर्व शिक्षण फी परिक्षा फी प्रतीपुर्ती योजना | • प्रमाणित दराने शुल्क आकारणा-या मान्यताप्राप्त अशासकीय संस्थांमधील प्रवेशित विदयार्थ्यांस वय व उत्पन्न विचारात न घेता शुल्क प्रतिपुर्ती केली जाते.<br>- इयत्ता १ ली ते ४ थी रु.१००/- दरमहा<br>- इयत्ता ५ वी ते ७ वी रु.१५०/- दरमहा<br>- इयत्ता ८ वी ते १० वी रु.२००/- दरमहा | • पालक महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असतील.<br>• अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवगातील असावा.<br>• खाजगी विनाअनुदानीत शाळांमध्ये इ.१ ली ते इ.१० वी च्या वर्गात शिक्षण घेत असावा.<br>• दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील असावा. |
| अस्वच्छ व्यवसायात काम करणा-या पालकांच्या मुलांना मॅट्रिकपुर्व शिष्यवृत्ती | • १ली ते २री च्या वसतीगृहात न राहणा-या विद्यार्थ्यांना दरमहा रु ११०/- व वार्षिक तदर्थ अनुदान रु. ७५० /-<br>• ३री ते १०वी च्या वसतीगृहात न राहणा-या विद्यार्थ्यांना दरमहा रु ११०/- व वार्षिक तदर्थ अनुदान रु. ७५० /-<br>• ३री ते १०वी च्या वसतीगृहात राहणा-या विद्यार्थ्यांना दरमहा रु ७००/- व वार्षिक तदर्थ अनुदान रु. १००० /- | • अस्वच्छ व्यवसायात काम करणारे, अस्वच्छ व्यवसायाशी परंपरेने संबधित सफाईगार, कातडी सोलणे, कातडी कमावणे तसेच कागद, काच, पत्रा वेचणे या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींच्या पाल्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.<br>• ही शिष्यवृत्ती सर्व जाती-धर्माला लागू आहे.<br>• उत्पन्नची अट नाही. |
| इ. ९ वी व इ. १० वी च्या अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची मॅट्रिकपुर्व शिष्यवृत्ती | • वसतिगृहात राहणारे - दरमहा ३५० रुपये आणि पुस्तके व तदर्थ अनुदान वार्षिक रु.१०००/-<br>• वसतिगृहात न राहणारे दरमहा १५० रुपये पुस्तके व तदर्थ अनुदान वार्षिक रु ७५०/- | • शासकिय मान्यता प्राप्त शाळेत शिकणारा असावा.<br>• अनु. जाती प्रर्वगातील असावा.<br>• पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु.२.०० लक्ष पर्यंत असावी.<br>• किमान गुणांची अट नाही.<br>• केंद्र शासनाची इतर कोणतीही शिष्यवृत्ती घेणारा नसावा. |
| इ. ५ वी ते १० वी च्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती | • इयत्ता ५ वी ते ७ वी मधील मुलींना वार्षिक रु.६००/-<br>• इयत्ता ८ वी ते १० वी मधील मुलींना वार्षिक रु.१०००/- | • उत्पन्न व गुणांची अट नाही.<br>• अर्ज करण्याची आवश्यकता नाही मात्र शाळेने ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.<br>• अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील असावी.<br>• महाराष्ट्र राज्याची रहिवासी असावी. |

| | | |
|---|---|---|
| **माध्यमिक शाळेतील ५ वी ते १० वी तील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती.** | • *इयत्ता ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना वार्षिक रु.५००/-*<br>*इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना वार्षिक रु.१०००/-* | • *मान्यताप्राप्त प्राथमिक / माध्यमिक शाळेतील इ. ५वी ते १०वी च्या वर्गामध्ये शिकणारा असावा.*<br>• *अनुसूचित जाती व नवबौदध प्रवर्गातील असावा.*<br>• *मागील वार्षिक परिक्षेत कमीत-कमी ५० % व त्याहून अधिक गुण मिळवूण मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधुन प्रथम व द्वितीय क्रमांकात उत्तीर्ण झालेला असावा.*<br>• *उत्पन्नाची अट नाही.* |

**डीबीटी पोर्टलवर नोंदणी करणेसाठी विद्यार्थी / पालकांना सूचना**

**अ) ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी पुर्वतयारी :-**

१. विद्यार्थ्यांनी आपला आधार क्रमांक काढणे आवश्यक आहे.
२. विद्यार्थ्याने कोअर बँकींग सुविधा असलेल्या बँकेच्या शाखेमध्ये खाते उघडणे आवश्यक आहे.
३. विद्यार्थ्याने आपला जातीचा दाखला, जात पडताळणी दाखला, १० वी १२ वी तसेच मागील परीक्षा उत्तीर्ण झालेला दाखला व गुणपत्रक, जन्मतारखेचा पूरावा, रहिवास दाखला, उत्पन्न दाखला, प्रवेशित महाविद्यालयाची माहिती, प्रवेशित अभ्यासक्रमाची माहिती, अभ्यासक्रमाचा कालावधी, बॅकेच्या पासबुकची झेरॉक्स, आधार कार्ड, दिव्यांग असल्यास दिव्यांगाचा दाखला, शिधा प्रत्रिका इ. कागदपत्रे तयार ठेवावीत.

**ब) नोंदणी कशी करावी :-**

१. आपण कोणत्याही ब्राऊझरचा वापर करुन (उदा. Internet Explorer (I.E.)/Google Chrome/Mozilla firefox etc.)
२. https://mahadbt.gov.in या वेबसाईटवर जाउन "नवीन नोंदणी" बटनावर क्लिक करावे.
३. प्रत्येक विद्यार्थ्याने (ज्या विद्यार्थ्यानी यापुर्वी e-scholarship पोर्टलवर नोंदणी केली होती. त्यांनी सुध्दा) mahadbt पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे. आधार क्रमांकाचा उपयोग करुन नोंदणी करावी. त्यासाठी "आधार कार्ड आहे ?" असेल तर "होय" व नसेल तर "नाही" वर क्लिक करा.
४. त्यानंतर "OTP" हा पर्याय निवडा.

५. वैध आधार क्रमांक टाकल्यानंतर "OTP पाठवा" बटन क्लिक करा.
६. मोबाईल क्रमांकावर प्राप्त झालेला ओटीपी (One time password ) टाकून " पडताळणी करा " हे बटन क्लिक करावे.
७. उपलब्ध विंडोमध्ये नाव, जन्म दिनांक, फोन नंबर, पत्ता आधार संलग्न बँक खाते नंबर इ. आधार कार्डवरील माहिती आपोआप दिसेल.
८. आधार क्रमांक नसल्यास "आधार कार्ड नाही " हा पर्याय निवडा आणि आवश्यक ती माहिती भरावी व कागदपत्रे अपलोड करावीत.
९. नोंदणी अर्जाच्या विंडोमधील सर्व माहिती भरावी.
१०. स्वत:चा युजर नेम व पासवर्ड तयार करावा.

**क) अर्ज कसा भरावा -**

१. महाडीबीटी पोर्टलवर लॉगइन करणेसाठी "सिलेक्ट युजरमध्ये" जावून "विद्यार्थी" हा पर्याय निवडा.
२. युजर नेम व पासवर्ड टाकून लॉगइन व्हा.
३. लॉग्इन झाल्यानंतर विंडोमधील " योजना तपशील " यावर क्लिक करा. त्यानंतर विभागवार योजना आपण पाहू व निवडू शकाल.
४. आपणास ज्या योजनेसाठी अर्ज करावयाचा त्या योजनेच्या नावासमोर "पहा" क्लिक केले असता योजनेची सर्व माहिती दिसू शकेल.
५. त्यानंतर कोणत्या योजना (मॅट्रीकपूर्व / मॅट्रीकोत्तर) साठी आपण पात्र आहात त्याची खात्री करा, व पर्याय क्लिक करा. (उदा. शालेय विद्यार्थ्यांनी "मॅट्रिकपुर्व " व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी "मॅट्रिकोत्तर" हा पर्याय निवडावा.)
६. आवश्यक ती सर्व माहिती उदा. जात, प्रवर्ग, महाराष्ट्राचे रहिवासी, अपंगत्व, कौटुंबिक उत्पन्न इ. सॉफटवेअर मध्ये काळजीपुर्वक भरावी.
७. पालकाची माहिती, शाळा / महाविद्यालयाचा तपशील नमुद करावा.
८.आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करावीत. (रहिवास दाखला, उत्पन्न दाखला, एसएससी प्रमाणपत्र,जात प्रमाणपत्र, वैधता प्रमाणपत्र, बॅक खाते क्रमांक, आधार क्रमांक इ. )
८. अभ्यासक्रमाचा तपशील, मागील परिक्षा उत्तीर्ण झाल्याचा तपशील इ सर्व माहिती अर्जदाराने भरावयाची आहे, आणि सबमिशन पेजमधील सादर या बटनवर क्लिक करावयाचेआहे.
९. विद्यार्थी / पालकाना काही अडचणी असल्यास त्यानी १८००१०२५३११ या टोल फ्री वर किंवा helpdesk@mahadbt.gov.in या ईमेल आयडीवर संपर्क करावा.

## ड) महाविद्यालयासाठी सूचना

१. महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांना ऑनलाईन नोंदणी करणे व अर्ज करणेसाठी सहकार्य करावे.
२. अनुसूचित जातीच्या कोणत्याही पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्काची रक्कम घेवू नये.
३. विद्यार्थ्यांना आधार क्रमांक काढणे, कोअर बँकिंग सुविधा असलेल्या बँकेच्या शाखेमध्ये खाते उघडणेसाठी सूचना दयाव्यात.
४. आपल्या महाविद्यालयाचे नांव, महाविद्यालयास मान्य असलेल्या अभ्यासक्रमाची नांवे, अभ्यासक्रमाचा कालावधी, अभ्यासक्रमनिहाय प्रवेश क्षमता, महाविद्यालयाच्या व अभ्यासक्रमाच्या मान्यतेचे विविध आदेश याबाबतची माहिती पोर्टलवर मॅप करणेसाठी आपआपल्या आयुक्तालयास / संचालनालयास / विद्यापीठास / परिषदेस सादर करुन ती मॅप करुन घेण्याची कार्यवाही करावी.
५. महाविद्यालय, त्यांचा अभ्यासक्रम, त्याची प्रवेश क्षमता, अभ्यासक्रमाचा कालावधी, शुल्क रचना इ. माहिती पोर्टलमध्ये समावेश (मॅप) करण्याची जबाबदार संबंधित महाविद्यालयाची असेल. त्यासाठी ज्या प्राधिका-यांनी ( Authority ) मान्यता दिली आहे त्यांचेशी संपर्क साधावा.

********